दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.२१ एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २३२ • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 21 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 232 • Pages 4 • Rate 4 Rs

## नीतेश राणे हा भाजपचा दोन फुटांचा नेता

**मुंबई**–वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत भाजप नेते तथा मंत्री नीतेश राणे व आमदार संग्राम जगताप यांच्यावर सडकून टीका केली आहे. राहुरीत मागील ३-४ वर्षांपासून धार्मिक वातावरण बिघडवून दंगल घडवण्याचे षडयंत्र सुरू आहे, असे ते या दोन्ही नेत्यांचे नाव घेत म्हणाले. या प्रकरणी त्यांनी राणे यांचा उल्लेख भाजपचे दोन फुटांचे नेते असा केला. तर जगपात यांना ते आयटम असे म्हणाले.राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक येत्या २३ तारखेला होत आहे. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने संतोष चोळके यांना उमेदवारी दिली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी नुकतीच त्यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. त्यानंतर आज सुजात आंबेडकर त्यांच्या प्रचारसाठी मैदानात उतरले. यावेळी त्यांनी आमदार संग्राम जगताप व मंत्री नीतेश राणे यांच्यावर सडकून टीका केली.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३० जूनच्या आधी कर्जमाफी मिळणार; कृषीमंत्र्यांनी दिले संकेत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**
आगामी खरीप हंगामावर 'एल निनो'चे सावट असून यंदा राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्केच पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर यंदा १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोमवारी दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात घोषित केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' ३० जूनच्या आत राबवली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
पुण्यातील शिवाजीनगर भागात नव्याने बांधण्यात आलेल्या 'सारथी'च्या सभागृहात खरीप हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीसाठी राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत भरणे बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
यंदा खरिपासाठी २०.१७ लाख क्विंटल बियाण्यांची गरज असून, २८.०५ लाख क्विंटल साठा उपलब्ध आहे. खतांच्या बाबतीतही राज्य सुरक्षित असून, ४८.८० लाख मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे. सद्यस्थितीत २५.१७ लाख मेट्रिक टन खत उपलब्ध असून, टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेतल्याचे भरणे यांनी स्पष्ट केले.



### दुष्काळाचा सामना करण्या साठी तंत्रज्ञानाचा आधार

कमी पावसाच्या अंदाजामुळे कृषी विभागाने हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी आणि 'बीबीएफ' तंत्रावर भर देण्याचे ठरवले आहे. शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्यासाठी 'महाकृषी' आणि 'महाविस्तार' पसह सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. तसेच नुकसानग्रस्त १३६ लाख शेतकऱ्यांसाठी २० हजार १९६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, अलीकडील अवकाळी पावसाचे पंचनामेही युद्धपातळीवर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

## खडकमांजरी येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांची ८९५ वी जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**
लोहा तालुक्यातील मौजे खडकमांजरी येथे क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची ८९५ वी जयंती ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, महात्मा बसवेश्वर चौक तसेच हनुमान मंदिरासमोर मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरी करण्यात आली.
यावेळी महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच गोड मिठाई वाटप व फटाक्यांची आतिषबाजी करून जयंती उत्सव साजरा करण्यात आला.
कार्यक्रमात शिवा संघटनेचे विद्यार्थी आघाडीचे लोहा तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे यांनी आपल्या शब्दात मनोगत व्यक्त करताना महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, महात्मा बसवेश्वर हे केवळ भारतातीलच नव्हे तर



जगातील लोकशाहीचे जनक, समतेचे नायक आणि विरशैव-लिंगायत धर्माचे प्रचारक व प्रसारक होते. त्यांनी १२व्या शतकात समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी, स्त्री-पुरुष समानतेसाठी आणि आंतरजातीय विवाहासाठी मोठा लढा उभारला.
महात्मा बसवेश्वर यांचा जन्म इ.स. ११३१ मध्ये कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे आई मादलंबिका व वडील मादीराज यांच्या पोटी झाला. ते वीरशैव-लिंगायत धर्माचे महान संत व समाजसुधारक होते. इ.स. ११३१ ते ११६७ हा त्यांचा जीवनकाळ होता.
यावेळी सरपंच प्रतिनिधी माधवराव पाटील कापसे, पोलिस पाटील गौतम वाघमारे, चांदोबा एडके, सामाजिक कार्यकर्ते रामकिशन नरवाडे, माजी ग्रामपंचायत सदस्य दलित वाघमारे, भिमराव वाघमारे, विठ्ठल वारकड, विकास वाघमारे, डॉ. मनोहर चोंडे, दिनाजी गायकवाड, चरण कापसे, विजय होळगे, केशव महाराज कापसे, गंगाधर होळगे, बाळू वारकड, सोनाजी खराटे, माधव बडवणे यांच्यासह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## परशुराम जयंती सत्य, शौर्य आणि धर्मरक्षणाचा संदेश देणारा दिवस-व्याख्याते विश्वंभर पाठक

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**
भगवान परशुराम जयंती ही केवळ धार्मिक परंपरा नसून सत्य, शौर्य आणि धर्मरक्षणाचा संदेश देणारा पवित्र दिवस असल्याचे व्याख्याते विश्वंभर पाठक यांनी सांगीतले. शहरातील दत्त मंदिरात समस्त ब्राम्हण समाजाच्या वतीने आयोजित व्याख्यान कार्यक्रमात भगवान परशुराम जयंतीच्या पुर्वसंध्येला दि. १८ शनिवारी बोलत होते.
पुढे बोलतांना व्याख्याते श्री. पाठक म्हणाले की, क्षात्रतेज आणि ब्रम्हतेज ज्यांच्या ठायी एकवटले आहे असे श्री भगवान परशुराम आहेत. त्यांनी अन्यायी राजाच्या विरूध्द लढा देउन दुष्टांचे निर्दालन केले. भगवान परशुराम हे केवळ योध्दा नसून स्थापत्य शास्त्रज्ञ, शेतकी तज्ञ आणि शास्त्र आणि शस्त्र अशा दोन्ही गोष्टींत पारंगत होते तर भगवान विष्णुचा ते सहावा अवतार होते असेही सांगीतले. प्रास्ताविक नगरसेवक डॉ. सचिन देशमुख यांनी केले. यावेळी पत्रकार



संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, सुरेश भानप, डॉ. स्वानंद कुलकर्णी, बप्पा देशमुख यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन हिमांशु देशमुख यांनी केले तर आभार प्रा. समीर मुळी यांनी मानले. कार्यक्रमास अनंतशास्त्री जोशी, बी. एन. कुलकर्णी, दत्ता काळे, नंदकुमार आनंदगांवकर, भालचंद्र पाठक, डॉ. शैलेश पाठक, मुकुंद जोशी, कमलेश जाब्रस, संतोष मुळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी योगेश जोशी, प्रसाद देशमुख, सुयोग पोतदार, प्रशांत भानप, डॉ. महेश पारगावकर, डॉ. डी. जे. पारगावकर, संतोष काटकर, गोपाळ कुलकर्णी, सतीश जोशी, डॉ. प्रशांत पाटील, दत्ता महाजन, संतोष वाघोरकर, विनायक रत्नपारखी, सुनिल वैद्य, अमोल कुलकर्णी, स्वानंद पाठक, ओंकार जाब्रस यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमानंतर महाआरती करून प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## सौ.नंदाबाई बाबुराव बरडे यांचे दु:खद निधन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**
लोहा तालुक्यातील शेवडी (बा) येथील रहिवासी सौ. नंदाबाई बाबुराव बरडे यांचे सोमवार दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी ५.०० वाजता दु:खद निधन झाले. त्या स्वभावाने प्रेमळ, मनमिळावू व कर्तव्यदक्ष गृहिणी होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, नातू असा परिवार आहे. शिवैक्य. सौ. नंदाबाई बाबुराव बरडे यांचा अंत्यविधी आज मंगळवार दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता विरशैव लिंगायत स्मशानभूमी, शेवडी (बा.) येथे होणार आहे.
शोकाकुल - बरडे परिवार शेवडी (बा)



## समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने २६एप्रिल२०२६ रोजी धारावीत महाअधिवेशन!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । दत्ता खंदारे**
समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने समाजातील सर्व घटकांना एकत्रित आणण्यासाठी आणि सरकारकडे कक्कय्या समाजाच्या मागण्या मांडून त्या सोडविण्यासाठी रविवार दिनांक २६एप्रिल २०२६ रोजी धारावीत एकदिवशीय महाअधिवेशन घेण्यात येणार आहे.सदर महाअधिवेशन मनोहर जोशी विद्यालय, प्रांगण, धारावी डेपो,पी एम जी पी संकुल जवळ, धारावी - मुंबई ४०० ०१७ येथे सकाळी ९ते ६ या वेळेत होणार आहे.
सदर महाअधिवेशनासाठी श्री.सुशीलकुमार




शिंदे
(माजी गृहमंत्री,भारत सरकार)कु.प्रणिती शिंदे
(खासदार सोलापुर),श्री. रामदास आठवले(मंत्री सामाजिक न्याय विभाग भारत सरकार ),
श्री.संजय शिरसाट(मंत्री सामाजिक न्याय विभाग,)श्री. मंगलप्रभात लोढा(मंत्री कौशल्य विकास),
श्री.आशिष शेलार(माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री )वर्षाताई गायकवाड (खासदार ),श्री.अनिल देसाई (खासदार ),श्री.राहुल शेवाळे (माजी खासदार ),
श्री.अमित साटम (आमदार),सौ. कल्पना नरहिरे(माजी खासदार ),ज्योती गायकवाड(आमदार )श्री. ज्ञानराज चौगुले (माजी आमदार ),श्री. सुभाष साबणे (माजी आमदार )श्री.बाबुराव माने (माजी आमदार ),श्री. धर्माजी सोनकवडे(माजी आमदार)तसेच समाजातील अनेक नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.असे समस्त कक्कय्या समाज महासंघाचे अध्यक्ष श्री. निवृत्ती सावळकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## म.बसवेश्वरमध्ये पोस्टर्स व घोषवाक्य स्पर्धा पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**
महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभागा तर्फे पर्यावरण संवर्धन, डिजिटल सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता व भविष्यकाम, महिला सबलीकरण, आरोग्य जागरूकता, साहित्याची ताकद, मानवी हक्क, वाहतूक शिक्षण, मोबाईल व्यसन आणि सामाजिक कार्य या विषयावर नुकतीच पोस्टर्स व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
या स्पर्धेत महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील ४६ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.
सामुदायिक कार्य या विषयात प्रथम क्रमांक द्वितीय वर्षातील ऋत्विक मोरे याने मिळविला. साहित्याची ताकद या विषयात द्वितीय क्रमांक प्रथम वर्षातील रुपाली गोरे, मोरे वैष्णवी, गरुड पार्वती यांनी मिळविला. महिला सबलीकरण या विषयात तृतीय क्रमांक द्वितीय वर्षातील ढेकले राजश्री, कांबळे अंकिता यांनी मिळविला. प्रोत्साहनपर पारितोषिक प्रथम वर्षातील गवळी सुषमा हिला देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून सामाजिक प्रश्नांवर सजग अभिव्यक्ती सादर केली. आकर्षक पोस्टर व प्रभावी घोषवाक्यांमधून त्यांनी समाज जागृतीचा मोलाचा संदेश दिला. वरील सर्व विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.रमेश तडवी, ग्रंथपाल डॉ.प्रमोद सराफे, प्रो.डॉ.संजय गवई, परीक्षक डॉ.अमित पवार व प्रा.भाग्यश्री भुजबळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्रा.रमेश तडवी म्हणाले की, स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढते व सामाजिक जाणीव दृढ होते. भाषा, साहित्य व कला यांचा संगम समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचा ठरतो. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आपल्या महाविद्यालयातील समाजकार्य विभाग हा शैक्षणिक विकासासोबत सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये अग्रभागी असतो. समाजकार्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समाजाभिमुख व्यक्तिमत्व घडते.

## गागलेगांव येथील माजी सरपंच श्री राजेश्वर पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**बिलोली । हानुमंत चंदनकर**
बिलोली तालुक्यातील गागलेगांव येथील माजी सरपंच तथा हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्री राजेश्वर पाटील यांचा आज दिनांक एप्रिल रोजी वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला लोकभिमुख व्यक्तिमत्व प्रेमळ मितभाषी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे गोर गरिबाच्या सुखदुःखात धावून जाणारे व समाजातील तळागाळातील लोकांसोबत प्रेमाची नाळ जोडलेले आदर्श सरपंच म्हणून श्री राजेश्वर पाटील यांची ओळख आहे आज त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने पहाटेपासूनच व्हाट्सअप फेसबुक ट्विटर व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव झाला ते पाच वर्ष लोकप्रतिनिधी म्हणून उत्तम काम पाहिले तर २००९ पासून ते आजतागायत हनुमान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात त्यांचं सर्वत्र अभिनंदन व सर्वसरातून शुभेच्छा चा वर्षा होत आहे.



# संपादकीय

## विदर्भात राष्ट्रपतींचा प्रेरणादायी दौरा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नागपूर–वर्धा दौऱ्याने विदर्भात विशेष लक्ष वेधले, विविध दीक्षांत समारंभांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रशासन, वैद्यक आणि शिक्षण क्षेत्रात नैतिकता व समावेशकतेचा संदेश देत त्यांनी विकसित भारताच्या दिशेने प्रेरणा दिली.भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची या आठवड्यातील नागपूर आणि वर्धा भेट हीच महत्त्वाची बातमी राहिलेली आहे. आपल्या दोन दिवसांच्या या दौऱ्यात त्यांनी नागपूरच्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सच्या दुसऱ्या दीक्षांत समारोहात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली, तर नॅशनल ॲकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या ७८ व्या तुकडीच्या समारोप सोहळ्याला देखील त्या उपस्थित राहिल्या. त्याचबरोबर वर्धा येथे जाऊन त्यांनी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारोहात प्रमुख अतिथी म्हणूनही मार्गदर्शन केले.नॅशनल ॲकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ही भारत सरकारची महसूल खात्यातील सनदी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९४४ मध्ये झाली. त्यावेळी ही अकादमी आय. आर. एस. स्टाफ ट्रेनिंग कॉलेज या नावाने कोलकाता येथे सुरू झाली होती. नंतर १९५६ मध्ये देशात राज्य पुनर्रचना झाली. त्यावेळी नागपूर शहराचे राजधानीपद गेले होते. म्हणून केंद्र सरकारने नागपुरात काही महत्त्वाच्या केंद्रीय संस्था आपल्या मुख्यालयासह स्थापित केल्या. त्यात आजची निरी, ॲगमार्क लॅबोरेटरी आणि आय. आर. एस. स्टाफ कॉलेजचा समावेश होता. १९८० पर्यंत ही संस्था आय. आर. एस. स्टाफ ट्रेनिंग कॉलेज म्हणूनच ओळखली जात होती. मात्र १९८० मध्ये या संस्थेचे रूपांतर नॅशनल अकादमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेसमध्ये करण्यात आले. आज नागपुरात छिंदवाडा रोडवर विशाल अशा परिसरात या अकादमीचे कामकाज चालते आहे.या अकादमीत झालेल्या ७८ व्या बॅचच्या समारोप सोहळ्यात राष्ट्रपतींनी सर्व नव्याने तयार होणाऱ्या सनदी महसूल अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. या बॅचमध्ये १३० अधिकारी असून १६ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ते आता प्रशासनात सक्रिय होणार आहेत. यावेळी या नव्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना विकसित भारत या संकल्पनेकडे देश वाटचाल करत असताना प्रशासनातील पारदर्शकता कार्यक्षमता आणि समावेशकता अधिक बळकट करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपतींनी केले. यावेळी त्यांनी कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा उल्लेख करताना नागरिकांवर कराचा अतिरिक्त भार न टाकता न्याय्य आणि संतुलित पद्धतीने काम करा, असा सल्लाही दिला. २०१४ मध्ये नागपूरचे खासदार नितीन गडकरी केंद्रात मंत्री झाले. त्याच वर्षी नागपूरकर देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. या दोघांच्या कालखंडात नागपुरात ज्या काही नव्या संस्था आल्या त्यात ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स या संशोधन संस्थेचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. आज वर्धा मार्गावर मिहानमध्ये या संस्थेचे विस्तीर्ण कॅम्पस कार्यरत आहे आणि तिथे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनाचीही सुविधा उपलब्ध आहे. या संशोधन संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झालेला आहे. या संस्थेचा दुसरा दीक्षांत सोहळा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णू देव शर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव असे सर्वच मान्यवर उपस्थित होते. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते संस्थेतील सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यात डॉ. प्रियंका, डॉ. वैदेही लोया, डॉ. वेदवती बंडोपाध्याय, डॉ. श्रीहरी बाबू, डॉ. तोसिफ अहमद प्रभृती गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश होता. तंत्रज्ञान कितीही प्रगत झालेले असले तरीही वैद्यक व्यवसायातील डॉक्टरांची बुद्धिमत्ता नैतिकता प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन हाच रुग्णसेवेत महत्त्वाचा भाग ठरणार आहे. त्यामुळे याच विचारांनी विद्यार्थ्यांनी पुढे जावे, असे आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केले. हा केवळ व्यवसाय म्हणून न बघता संवेदनशीलतेने मानव सेवा करण्याचा मार्ग आहे असेही राष्ट्रपतींनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितले. नागपूर नजीकचा वर्धा जिल्हा हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भूदान चळवळीतील अग्रणी विनोबा भावे यांची कर्मभूमी म्हणून ओळखला जातो. आजही पवनार येथे विनोबा भावे यांचा तर सेवाग्राम येथे महात्मा गांधींचा आश्रम कार्यरत आहे. महात्मा गांधी हे हिंदीचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळेच वर्धा येथे सुमारे २५ वर्षांपूर्वी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. आज देशभरातून विद्यार्थी येथे येऊन हिंदीचे अध्ययन आणि संशोधन करीत असतात. या विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारोहात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या हस्ते विविध विद्याशाखातील आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पदवी प्रदान करण्यात आली. महात्मा गांधींनी विकसित भारताचे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याच तत्त्वावर मार्गक्रमण करावे, असे आवाहन राष्ट्रपतींनी यावेळी केले. आपल्या मातृभाषेचा अभ्यास करताना इतर भाषांना विरोध करू नका, तर इतर भाषा तुम्ही अभ्यासा आणि त्याचाही प्रचार करा असाही हितोपदेश त्यांनी विद्यार्थ्यांना केला. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल विष्णु देव शर्मा हे देखील उपस्थित होते.आपल्या वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यात राष्ट्रपतींनी सेवाग्राम आश्रमाला भेट देऊन महात्मा गांधींना आदरांजली अर्पण केली. तेथे आश्रमाच्या प्रार्थना सभेत देखील त्या सहभागी झाल्या होत्या. तसेच त्यांनी परिसरात वृक्षारोपण देखील केले. बापू कुटीला भेट देऊन त्यांनी तेथे पाहणी केली. सोबतच कस्तुरबा गांधी यांचे वास्तव्य असलेले बा निवास आणि बापूंच्या कार्यालयाला देखील त्यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी आश्रमवासीयांसोबत सूतकताई देखील केली. एकूणच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा दोन दिवसांचा नागपूर आणि वर्धा दौरा हा विदर्भात चर्चेचा विषय राहिला आहे.

# ‘पात्र लाडक्या बहिणी लाभा पासून वंचित राहणार नाहीत’

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

बोरीचा माळ सारख्या छोट्या गावात लक्ष्मी नारायणाचे मंदिर उभे राहिले आहे. त्यामुळे आता तुम्हाला रोज लक्ष्मी नारायणाचे दर्शन मिळेल आणि त्याद्वारे गावाचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही, सर्वांना उत्तम आरोग्य, सुख समृद्धी लाभेल,भरभराट होईल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. तळे जवळील बोरीचा माळ गावातील नव्याने बांधण्यात आलेल्या श्री लक्ष्मी नारायण मंदिराचा लोकार्पण सोहळा आज अक्षय्य तृतीयेच्या शुभ त्यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी शिंदे यांनी उपस्थित स्थानिक ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी बोलताना, खरं तर गावात मंदिर आले म्हणजे एक मांगल्य आले पवित्र वातावरण आले. घरी पूजा केली तरी आपण मंदिरात अजून देवाचे दर्शन घेतो आणि या सुंदर मंदिरात देवाचे दर्शन घेण्याची संधी मिळवून दिली ती आमदार तुकाराम काते, ग्रामस्थ, देवजी काते यांचे मनापासून अभिनंदन करतो असे सांगितले. या मंदिरातील मूर्ती ३०० वर्षापूर्वी मुंबईहून पायी चालत या गावी आणण्यात आल्या. ज्यांनी त्या काळी हे करून दाखवले त्यांचेही आभार मानायला हवेत. त्याकाळच्या लोकांनी प्रचंड हालअपेष्टा सोसलेल्या आहेत. त्या तुलनेत आता सर्वच ठिकाणी विकास झालेला आपल्याला दिसत असल्याचे सांगितले. रायगड हा जिल्हा निसर्ग संपदेने समृद्ध असा जिल्हा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास या भूमीत घडलेला आहे. त्यामुळेच या मातीतला मावळा भरतशेठ आज मंत्री झाले आहेत. रायगड ही पुण्यभूमी आहे. या मातीत येणाऱ्या प्रत्येकाला समाधान मिळाल्याशिवाय राहणार नाही असे यावेळी शिंदेंनी नमूद केले. मंदिर बांधण्याचे एक वेगळे समाधान माणसाला असते. या मंदिराचे पावित्र्य जपणे, दररोज दिवा बत्ती करणे, पूजा अर्चा करणे, स्वच्छता टापटीपणा ठेवणे हे आपल्या गावकऱ्यांचे काम आहे. हे काम करण्यासाठी तळा नगर पंचायतीला मी १६ कोटी दिले होते, आता पुन्हा पिण्याच्या पाण्याच्या योजनेसाठी ६ कोटींची मागणी आली आहे. हा निधी देखील नक्की देईन असेही त्यांनी यावेळी सांगितले. माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मी ५६७ निर्णय घेतले. लाडकी बहिण योजना सुरू करण्याचा निर्णय त्यात महत्त्वाचा होता, अनेक जण ती योजना होऊ नये यासाठी कोर्टात गेले. मात्र तरीही ही योजना यशस्वी करून दाखवली. दीड हजारात काय होते असे विरोधक म्हणाले, पण माझ्या लाडक्या बहिणींना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले, स्वतःचे पैसे स्वतः काढून घेण्याचा अधिकार मिळाला. कुणीही कितीही प्रयत्न केले तरीही ही योजना कधीही बंद होणार नाही. काही महिलांचे ई–केवायसी पूर्ण झाली नसल्याने पैसे येत नव्हते तेव्हा मी महिला आणि बालकल्याण विभागाला सांगून या ई–केवायसीला एक महिन्याची मुदतवाढ देण्यास सांगितले. त्यामुळे पात्र लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित राहणार नाहीत ही जबाबदारी आमची राहील असे यावेळी बोलताना शिंदे यांनी स्पष्ट केले. लेक लाडकी लखपती योजना केली, एका मुलीने शिक्षणासाठी पैसे नसल्याने आत्महत्या केल्याचे समजल्यावर मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला, मुख्यमंत्री सहाय्यता



निधीतून अडीच वर्षात ४७० कोटींची मदत देण्यात आली, महात्मा फुले योजनेत दीड लाखांची मदत वाढवून पाच लाख करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील ब वर्ग तीर्थक्षेत्र मंदिराना दिले जाणारे दोन कोटीचे अनुदान वाढवून मी पाच कोटी करण्याचा निर्णय घेतला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाणाऱ्या दिंड्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला. हे सरकार सर्वसामान्यांचे असून त्यांच्या आयुष्यात चांगले दिवस यायला हवेत यासाठी मी काम करत आहे. मी स्वतः शेतकरी कुटुंबातून आलोय, शाखाप्रमुख ते मुख्यमंत्री होण्याचा प्रवास मी पूर्ण केला आहे. आई आणि पत्नीची काटकसर मी पहिली होती, त्यामुळेच माझ्या कारकिर्दीत महिलांसाठी लाडकी बहिण योजना सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी सांगितले. याठिकाणी हे लक्ष्मी नारायणाचे मंदिर उभे राहिले आहे, इथे गोर गरीब येऊन दर्शन घेतील, त्यांच्या जीवनात आनंद निर्माण होईल असे नमूद केले. माझ्या आयुष्यात पैसे, प्रॉपर्टी किती कमावली यापेक्षा तमाम जनतेचे प्रेम किती कमावले ते जास्त महत्त्वाचे असते. सत्ता खुर्ची यापेक्षा राज्यातील तमाम लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ ही ओळख आज माझ्यासाठी जास्त महत्त्वाची आहे असे सांगितले. मी मुद्दाम या छोट्या गावात आलो आहे, कारण तुकाराम काते हा आमच्या पक्षाचा सच्चा कार्यकर्ता आहे, बाळासाहेबांचा सच्चा कार्यकर्ता आहे. त्याने या छोट्याशा गावात एवढे भव्य मंदिर उभारले याचा मला सार्थ अभिमान आहे असे यावेळी नमूद केले. अतिशय सुंदर मंदिर उभे राहिले आहे आता फक्त गावकऱ्यांनी मिळून या मंदिराची योग्य निगा राखणे गरजेचे आहे, स्वच्छता,पावित्र्य, मांगल्य टिकवावे एवढीच अपेक्षा असल्याचे सांगितले. तळा नगरपंचायतीला या परिसराचा विकासासाठी निधी लागला तर तो नक्की उपलब्ध करून देऊ असे यावेळी सांगितले. या गावात अजून काही सुविधा निर्माण करायच्या असतील तर त्याही नक्की निर्माण केल्या जातील असेही यावेळी स्पष्ट केले. यावेळी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, आमदार तुकाराम काते, अनिल नवगणे, प्रमोद घोसाळकर, जिल्हाधिकारी किसनकुमार जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल, सुवर्णा करंजे, समृद्धी काते, अरुण चाळके, विपुल उभारे, राकेश वडके, रमेश मोरे आणि शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालकल्याणासाठी ‘हिमालया बेबीकेअर’ तर्फे ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’चे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

हिमालया बेबीकेअर या भारतातील आघाडीच्या व लोकप्रिय बेबीकेअर ब्रँडने स्माईल फाउंडेशनच्या सहकार्याने पुण्यात ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’ नुकतीच आयोजित केली. या उपक्रमात माता, त्यांची बाळे, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ज्ञ एकत्र आले होते. बालकांचा सर्वांगीण विकास, मातांचे आरोग्य आणि बालसंगोपनाच्या सुरुवातीच्या पद्धती यांबाबत जनजागृती करण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता.या स्पर्धेत ७५ हून अधिक मातांनी आणि त्यांच्या बाळांनी उत्साहाने भाग घेतला. आरोग्य तज्ज्ञ आणि ‘स्माईल फाउंडेशन’ची प्रोग्रॅम टीम यांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. संपूर्ण वातावरण उत्साही आणि समाजाभिमुख होते. त्यातून मातांचे व बालकांचे आरोग्य सुधारण्याबाबत समाजात मोठी उत्सुकता असल्याचे दिसून आले. स्पर्धेदरम्यान बाळांच्या हालचालींची कौशल्ये, त्यांची उंची, वजन आणि सक्रियता अशा महत्त्वाच्या विकास घटकांवर मूल्यमापन करण्यात आले.

हिमालया बेबीकेअर आणि स्माईल फाउंडेशन यांनी संयुक्तपणे या ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’चे विजेते जाहीर केले. प्राप्ती किरण गाढे यांना प्रथम क्रमांक देण्यात आला. वैदवी सचिन वाघ यांना दुसरा क्रमांक, तर साहिल दीपक मुकणे यांना तिसरा क्रमांक देण्यात आला. सर्व विजेत्यांना विशेष प्रमाणपत्र आणि हिमालया बेबी गिफ्ट पॅक देण्यात आला. तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि हिमालया बेबीकेअर सॅम्पल पॅक असलेली गूडी बॅग देण्यात आली.विकासाच्या मूल्यमापनासोबतच या प्रसंगी मातांना स्तनपान, बाळांचे पोषण, स्वच्छता, लसीकरणाचे वेळापत्रक आणि शिशूसंगोपन यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अशा प्रकारे माहितीपूर्ण आणि निरोगी पद्धतीने बाळांची काळजी घेण्याचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले.या उपक्रमाबाबत ‘हिमालया



वेलनेस कंपनी’चे बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले, बाळाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी सुरुवातीची वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’च्या माध्यमातून पालकांना वैद्यकीय मार्गदर्शन आणि उपलब्ध साधने देण्याचा आमचा उद्देश आहे; जेणेकरून बाळाच्या आरोग्याची मजबूत पायाभरणी ही सुरक्षितता आणि विश्वास यांच्या आधारे होईल.‘स्माईल फाउंडेशन’च्या ‘स्वाभिमान’ आणि ‘एम्पॉवरिंग ग्रासरूट्स’ या उपक्रमांच्या प्रमुख सरिता प्रधान म्हणाल्या, स्माईल फाउंडेशनच्या ‘स्वाभिमान’ उपक्रमांतर्गत आम्ही सामुदायिक स्तरावर मातांचे आणि बालकांचे आरोग्य बळकट करण्यावर लक्ष देतो. बाळांचे लहान वयातील योग्य पोषण, त्यांची काळजी आणि त्यासंदर्भात पालकांची जागृती यांतून दोघांच्याही आयुष्यावर सकारात्मक परिणाम होत असतो. ठाण्यातील सरळगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ‘हिमालया वेलनेस’च्या भागीदारीमध्ये आम्ही हा ‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’चा उपक्रम आयोजित केला. त्यावेळी आम्ही ७५ हून अधिक मातांशी आणि त्यांच्या बाळांशी थेट संवाद साधला आणि आयुष्याच्या सुरुवातीच्या वर्षांत निरोगी सवयींचे किती महत्त्व आहे हे मातांना समजावून सांगितले.‘हेल्दी बेबी कॉन्टेस्ट’च्या या व्यासपीठावर मातांना तज्ज्ञांशी संवाद साधण्याची, बाळांच्या संगोपनातील पोषण व स्वच्छता यांसारख्या महत्त्वाच्या बाबी जाणून घेण्याची आणि निरोगी पालकत्वाचा आनंद साजरा करण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमधून पालकांना योग्य माहिती आणि मार्गदर्शन देत निरोगी व आनंदी बाळांच्या संगोपनासाठी आपली कटिबद्धता हिमालया बेबीकेअर ब्रँड व्यक्त करीत असतो.

# एनसीपीए प्रस्तुत ‘प्रतिबिंब मराठी नाट्य उत्सव २०२६’: मराठी कथांसाठी एक प्रभावी रंगमंच

### मराठी रंगभूमीचा चार दिवसीय उत्सव–समृद्ध कथानक नव्या प्रतिभा आणि नुभवात्मक सादरीकरणांचा संगम

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) तर्फे ‘प्रतिबिंब मराठी नाट्य उत्सव’ पुन्हा एकदा रंगणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. गुरुवार, ३० एप्रिल ते रविवार, ३ मे २०२६ या कालावधीत एक्सपेरिमेंटल थिएटर, टाटा थिएटर आणि जेबीटी म्युझियम येथे हा उत्सव आयोजित करण्यात येणार आहे. मराठी कथनशैलीच्या बदलत्या प्रवाहाचे दर्शन घडवणारे नाट्यप्रयोग, वाचन सत्रे, कार्यशाळा आणि चर्चांचा विविधरंगी मेळा या उत्सवात पाहायला मिळणार आहे.मराठी रंगभूमीला प्रेरणा, प्रोत्साहन आणि पाठबळ देण्याच्या उद्देशाने ‘प्रतिबिंब’हा उत्सव साकारला गेला आहे. आपल्या नावाला साजेसा, महाराष्ट्राच्या समृद्ध नाट्यपरंपरेचे प्रभावी प्रतिबिंब या माध्यमातून उभे राहते. अनुभवी आणि नवोदित कलाकारांच्या लोकप्रिय तसेच प्रयोगशील कलाकृतींचा सुरेख मिलाफ येथे अनुभवता येतो.उत्सवाची सुरुवात गुरुवार, ३० एप्रिल रोजी सायं. ७.०० वाजता एक्सपेरिमेंटल थिएटरमध्ये ‘ बरड’ या पुरस्कारप्राप्त प्रयोगशील नाटकाने होणार आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित या नाटकात कौटुंबिक संघर्ष, जमिनीचे वाद आणि भावनिक गुंतागुंत यांचे प्रभावी आणि वास्तवदर्शी चित्रण आहे. ‘झी नाट्य गौरव पुरस्कार २०२६’मध्ये या नाटकाला अनेक सन्मान मिळाले आहेत.शुक्रवार, १ मे रोजी विविध स्वरूपातील कार्यक्रमांची रेलचेल असेल. सायं. ५.०० वाजता एक्सपेरिमेंटल थिएटरमध्ये ‘अभिजात मराठी: महाराष्ट्राच्या साहित्य वारशाला अभिवादन’हे ‘पेज टू स्टेज’वाचन सत्र सादर होईल. त्यानंतर सायं. ७.०० वाजता टाटा थिएटरमध्ये ‘नॉर्मल डे विथ डॅनी पंडित’ हा ऊर्जावान



स्केच कॉमेडी प्रयोग रंगणार आहे, ज्यामध्ये डिजिटल पात्रांना रंगमंचावर सजीव करण्यात येईल. शनिवार, २ मे रोजी दिवसभर विविध अनुभवात्मक उपक्रमांची रेलचेल असेल. सकाळी ११.३० ते दुपारी ३.३० या वेळेत टाटा थिएटरच्या एलिव्हेटर ब्लॉकमध्ये प्राजक्त देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ‘रायटर्स लॅब – आयडिया टू पेज’कार्यशाळा होईल. त्यानंतर सायं. ४.३० वाजता ‘अरे संसार संसार’हा बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांवर आधारित संगीत आणि कथनाचा विशेष कार्यक्रम सादर केला जाईल. सायं. ७.०० वाजता टाटा थिएटरमध्ये ‘लग्न पंचमी’हे आधुनिक नातेसंबंध आणि वैवाहिक जीवनातील सूक्ष्म पैलूंवर भाष्य करणारे नाटक रंगणार आहे.रविवार, ३ मे रोजी उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत जेबीटी म्युझियममध्ये अभय महाजन यांची ‘बॉडी अवेअरनेस – मूव्हमेंट’ कार्यशाळा होईल. दुपारी ३.०० वाजता ‘मग तू मला खा!’ हे डिजिटल ओळख आणि शरीर प्रतिमेवर आधारित प्रभावी नाटक सादर होईल. त्यानंतर सायं. ५.३० वाजता ‘कवितेचं पान लाइव्ह’ हा मराठी कवितेचा संवादात्मक अनुभव रंगणार आहे. उत्सवाची सांगता सायं. ७.१५ वाजता टाटा थिएटरमध्ये ‘करुणाष्टके’या स्त्रीत्व, दुःख आणि जिद्दीवर आधारित प्रभावी कालखंड नाटकाने होईल.एनसीपीएचे थिएटर अँड फिल्म्स विभाग प्रमुख ब्रूस गुथ्री म्हणाले, प्रतिबिंब हा एनसीपीएच्या नाट्य दिनदर्शिकेतील एक महत्त्वाचा घटक बनला आहे. मराठी रंगभूमीच्या समृद्ध परंपरेचा गौरव करतानाच तिच्या भविष्यासाठीही हा उत्सव मार्गदर्शक ठरत आहे. महामारीनंतर प्रत्येक वर्षी प्रेक्षकसंख्या लक्षणीयरीत्या वाढताना दिसते. नव्या लेखनातील आत्मविश्वास, धाडसी कथनशैली आणि प्रेक्षकांशी वाढती नाळ याचा प्रत्यय प्रत्येक आवृत्तीत येतो. यंदाचा उत्सव ‘महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने साजरा होत असल्याने, राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे जिवंत सादरीकरण अधिक अर्थपूर्ण ठरते.उत्सव निर्माती (थिएटर अँड फिल्म्स) राजेश्री शिंदे म्हणाल्या, प्रतिबिंब मराठी नाट्य उत्सव हा कथा, भावना आणि मराठी रंगभूमीच्या चिरंतन आत्म्याने आपल्याला एकत्र आणणारा सोहळा आहे. माझा नेहमीच विश्वास आहे की, पडदा पडल्यानंतर कथा संपत नाहीत... त्या संवाद, प्रश्न आणि नव्या दृष्टिकोनांना जन्म देतात. प्रेक्षक जेव्हा रंगमंचावर पाहिलेल्या गोष्टींशी जोडले जातात, तेव्हा नाट्य अधिक जिवंत आणि अर्थपूर्ण बनते. विविध वयोगट, पार्श्वभूमी आणि सीमा ओलांडणारा एक विचारशील प्रेक्षकवर्ग आणि कलाप्रेमी समुदाय निर्माण करण्याचे आमचे ध्येय आहे. नवोदित आणि प्रस्थापित नाट्यसंघांना समान संधी देऊन, नव्या कथनशैलींना व्यासपीठ देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या आशेने आम्ही ‘प्रतिबिंब’च्या पाचव्या आवृत्तीत पाऊल ठेवत आहोत... फक्त व्याप्तीत नव्हे, तर भावनेतही विस्तारत, प्रत्येक कलाकार आणि प्रेक्षकासाठी ‘घर’वाटेल अशी जागा बनवत.शिल्पा कुमार यांच्या सहकार्याने सादर होणारा ‘प्रतिबिंब मराठी नाट्य उत्सव २०२६’ हा केवळ नाट्यप्रयोगांपुरता मर्यादित नसून संवाद, शोध आणि कलात्मक देवाणघेवाणीचा बहुआयामी सांस्कृतिक अनुभव देणारा उत्सव आहे. * वैध ओळखपत्र सादर केल्यास विद्यार्थ्यांना २०% सवलत * बॉक्स ऑफिस: सदस्य आणि सर्वांसाठी खुले * तिकिटे एनसीपीए बॉक्स ऑफिस तसेच बुकमायशोवर उपलब्ध आहेत.


# चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

## नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाकडून आगामी काळात विदर्भात, विशेष करून चंद्रपूर जिल्ह्यात येणाऱ्या कालावधीत काही ठिकाणी उष्णतेची लाट (Heat Wave) येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने उष्णतेच्या काळात नागरिकांनी सुरक्षित राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी खालील प्रमाणे काळजी घ्यावी.१) तीव्र उन्हात विशेषतः दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान बाहेर पडणे टाळावे. २) पुरेसे पाणी पित राहावे. तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पाणी पिण्याची सवय ठेवावी. ३) घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी तसेच पांढरा शेला / दुपट्टा वापरावा. ४) सूर्यप्रकाशापासून बचावासाठीघरातील पडदे व झडपा वापराव्यात. ५) हलके, पातळ, सच्छिद्र व पांढऱ्या रंगाचे सूती / खादीचे कपडे वापरावेत. ६) प्रवास करताना किंवा कामाच्या ठिकाणी मुबलक पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. ७) शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, लिंबूपाणी, ताक, लस्सी इ. द्रवपदार्थ घ्यावेत. ८) घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. ९) घरामध्ये कुलर, पंखे किंवा वातानुकूलन (AC) यांचा योग्य वापर करावा. १०) कामगारांना सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळण्यासाठी सूचना द्याव्यात. ११) गरोदर महिला, वयोवृद्ध, आजारी व्यक्ती व लहान मुले यांची विशेष काळजी घ्यावी. १२) शिळे अन्न खाणे टाळावे. १३) उन्हात काम करताना चेहरा व डोके ओल्या कापडाने झाकावे. १४) शक्यतो दुपारी १२ ते ४ या कालावधीत श्रमाची कामे टाळावीत. १५) चक्कर येणे किंवा अस्वस्थ वाटल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. १६) पाळीव प्राणी व गुरेढोरे यांना सावलीत ठेवून त्यांना पुरेसे पाणी द्यावे. १७) उच्च प्रथिनयुक्त व शिळे अन्न खाणे टाळावे. १८) दुपारच्या वेळेस मद्य, चहा, कॉफी व कार्बोनेटेड शीतपेये पिणे टाळावे. उष्माघात झालेल्या व्यक्तीस तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करावा. नागरिकांनी वरील सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबाची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन, चंद्रपूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.



# पारदर्शकतेसाठी पालिका सभागृहात पत्रकारांना प्रवेशाची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकाभिमुखता दृढ करण्यासाठी पालिका सभागृहात पत्रकारांना थेट प्रवेश देऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. लोकशाही व्यवस्थेतील विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी ही गरज अनिवार्य बनत असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.

पालिका सभागृह हे लोकशाहीच्या कार्यप्रक्रियेचे केंद्रस्थान मानले जाते. येथे जनप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या मांडतात, प्रशासनाला जाब विचारतात आणि विविध विकासकामांवर निर्णय घेतात. मात्र या चर्चांचा सविस्तर आणि वस्तुनिष्ठ आढावा अनेकदा नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याने माहितीचा अभाव जाणवतो. परिणामी अफवा, गैरसमज आणि अविश्वासाला खतपाणी मिळण्याची शक्यता वाढते.याच पार्श्वभूमीवर पत्रकारांची भूमिका अधिक निर्णायक ठरते. पत्रकार हे प्रशासन आणि जनतेमधील विश्वासाचा दुवा असून त्यांच्या माध्यमातूनच सभागृहातील कामकाजाचे वास्तव चित्र समाजासमोर येते. त्यामुळे पत्रकारांना सभागृहात प्रत्यक्ष उपस्थित राहून निर्भीड व तटस्थ वार्तांकन करण्याची संधी मिळणे ही केवळ सुविधा नसून लोकशाही मूल्यांची गरज आहे.सध्या अनेक ठिकाणी पत्रकारांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. जागेअभावी प्रवेश मर्यादित राहतो, तर ध्वनीप्रणाली व तांत्रिक साधनांची कमतरता वार्तांकनात अडथळा ठरते. यामुळे माहिती अपुरी किंवा अपूर्ण स्वरूपात जनतेपर्यंत पोहोचते. पालिकेने पत्रकारांसाठी स्वतंत्र आसनव्यवस्था, सुसज्ज ध्वनीप्रणाली आणि आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून दिल्यास सभागृहातील कामकाज अधिक पारदर्शक होईल. यामुळे नागरिकांना अचूक, विश्वसनीय माहिती मिळेल आणि प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. एकूणच, ही मागणी मान्य करणे म्हणजे लोकशाहीची मुळे अधिक बळकट करण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

# वाढत्या उन्हामुळे शाळा-महाविद्यालये सकाळच्या सत्रात ११ वाजेपर्यंतच ठेवा

## जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी निर्गमित केले आदेश

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



जिल्ह्यात सध्या वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ११ मार्च २०२६ रोजी आयोजित बैठकीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद यांना शाळा सकाळ सत्रात घेण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.सध्या चंद्रपूर जिल्ह्यात उन्हाचा तीव्र तडाखा जाणवत असून तापमान ४४ अंश सेल्सिअसच्या वर पोहोचले आहे. दिवसेंदिवस उष्णतेची तीव्रता वाढत असल्याने शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः उष्माघात (सन स्ट्रोक) व इतर उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची ठरत आहे.दुपारच्या कडक उन्हात शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घरी जाताना होणारा त्रास टाळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या (शासकीय, अनुदानित व खासगी) शाळा व महाविद्यालयांच्या वेळांमध्ये तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सर्व शैक्षणिक संस्था सकाळच्या सत्रात सुरू करून जास्तीत जास्त सकाळी ११ वाजेपर्यंत सोडण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्षा वसुमना पंत यांनी या निर्देशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता बाळगावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# वारकरी संप्रदायावरील वक्तव्यावरून तीव्र निषेध

## माफी न मागितल्यास राज्यभर आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायातील गुरुवर्य महाराजांविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाशी संबंधित महाशय लवंडे यांच्या विरोधात अखिल भारतीय वारकरी संघटना तसेच वारकरी संघटनांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

वारकरी संप्रदाय हा संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या त्याग, भक्ती आणि संत परंपरेतून विकसित झालेला असून त्याची परंपरा महाराष्ट्रासह देश-विदेशात विस्तारलेली आहे. अशा पवित्र संप्रदायाबाबत कोणत्याही प्रकारची अवमानकारक टीका सहन केली जाणार नाही, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.अखिल भारतीय वारकरी संघटनेचे अध्यक्ष ह.भ.प. अण्णासाहेब सुपनवर यांनी सांगितले की, संबंधितांनी आपल्या वक्तव्याबद्दल तात्काळ शब्द मागे घेत वारकरी



संप्रदायाची जाहीर माफी मागावी. अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र स्वरूपाची आंदोलन उभारण्यात येतील, असा इशारा त्यांनी दिला.या निषेध बैठकीस वारकरी संप्रदायातील ह.भ.प. संजय बप्पा गायकवाड, काका भोगल, संजय वाळुंजकर, आदिनाथ घाडगे, संभाजी डवले, आबासाहेब तरंगे, मनाजी पवार, आबासाहेब शिंदे, स्वामी गायकवाड, शुभम शिंदे, सागर गुंजाळ, बापूराव बागल, सोमनाथ राऊत आदींसह अनेक वारकरी पदाधिकारी उपस्थित होते.

# वाडा-खडकोना येथे परशुराम जयंती उत्सव उत्साहात साजरा

## भव्य पालखी मिरवणूक ठरली मुख्य आकर्षण; भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**पालघर । प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील मनोरजवळ, मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या परशुराम मंदिर परिसरात रविवारी परशुराम जयंती उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विधीवत पूजा, अभिषेक व विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्सवाची सुरुवात झाली.

यानंतर गावामध्ये भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. विशेष म्हणजे वाडा-खडकोनाची पालखी मिरवणूक यंदा सर्वांचे लक्ष वेधून घेत मुख्य आकर्षण ठरली. हातात भगवे झेंडे, मुखी नामघोष आणि देवनामाचा गजर करत भक्तांनी परिसर भक्तिमय केला. डीजेच्या ठेक्यावर तरुणांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला.



पालखी मिरवणुकीचे उद्घाटन शिवसेना उपनेते उत्तम पिंपळे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर भाजपचे पदाधिकारी ताराचंद जोशी यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूपात पार पडली. कडक उन्हातही भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. मिरवणुकीदरम्यान ग्रामस्थांनी ठिकठिकाणी स्वागत करून फुलांचा वर्षाव केला. या भक्तिमय सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी महामार्गावरील प्रवाशांनीही गर्दी केली.या प्रसंगी उत्तम पिंपळे यांनी परशुराम जयंती उत्सवाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पालघर तालुक्यातील या परशुराम मंदिराला अधिकृत धार्मिक स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात येथे नवरात्र उत्सव साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी मंदिर संस्थानाला केले.

कार्यक्रमाला भाजपचे सरचिटणीस ताराचंद जोशी, पंकज महाराज, मनोज सिंह, सुमित सिंह, नरेंद्र तिवारी, सरपंच अरुण आहाडी, सदस्य रोहित शेलका, अक्षय उमतोल, तसेच गणेश चव्हाण, अशोक मोर्या, विलास सुमडा, आशिष सिंह, नितीन बोंबाडे यांच्यासह बोईसर, वाडा-खडकोना व मनोर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप महाप्रसाद वितरणाने करण्यात आला. दिवसभर संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. श्रद्धा, उत्साह आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने हा परशुराम जयंती उत्सव सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला.

# ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे संस्थापक शब्बीर अहमद अन्सारी यांना बोईसरमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली

दैनिक वादळ वार्ता

**पालघर । प्रतिनिधी**

ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक शब्बीर अहमद अन्सारी यांच्या निधनानिमित्त रविवारी (दि. १९ एप्रिल २०२६) बोईसर येथील भैयापाडा परिसरातील दारुल उलूम गौसिया मदरशात दुआ-ए-मगफिरत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. २२ मार्च २०२६ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या कार्याचा गौरव करत राज्यासह देशभरात कुराण पठण व प्रार्थना सभांचे आयोजन करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे पालघर जिल्हाध्यक्ष आशाद बने शेख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रारंभी मदरशातील विद्यार्थ्यांनी कुराण पठण केले. त्यानंतर मदरशाचे मुफ्ती, कारी व मौलाना यांनी तिलावत सादर करत वातावरण भक्तिमय केले.




कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रफीक दाऊद शेख यांची विशेष उपस्थिती होती. तसेच मुंबईहून महाराष्ट्र जनरल सेक्रेटरी इसहाक खडके (पप्पू सय्यद) व ऑल इंडिया मुस्लिम सलमानी बिरादरीचे मकसूद सलमानी शेख उपस्थित होते. चिंचणी येथील रऊफ शेख, तारापूर येथील गुलजार खलिफा यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहून अन्सारी यांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमात गुल मोहम्मद खान, सलाम शेख, मुन्ना शेख, राजू खान यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना आशाद शेख म्हणाले, शब्बीर अहमद अन्सारी यांनी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी जो क्रांतीचा दीप प्रज्वलित केला, तो पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. त्यांच्या कार्याची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

दारुल उलूम गौसियाचे अध्यक्ष रफीक दाऊद शेख यांनी अन्सारी यांच्या निस्वार्थी सेवेचे स्मरण करत त्यांच्या कार्याला पुढे नेणे हीच खरी श्रद्धांजली असल्याचे सांगितले.सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाचा समारोप फातिहा पठण व नियाज वाटपाने करण्यात आला.

# यवत परिसरात शेतातील वादातून चाकू हल्ला; एक जखमी,दोघांवर गुन्हा

दैनिक वादळ वार्ता

**पाटस । प्रतिनिधी**

यवत परिसरात शेतातील फुलझाडांच्या नुकसानीवरून झालेल्या वादातून चाकू हल्ल्याची गंभीर घटना घडली असून, यात एक जण जखमी झाला आहे. या प्रकरणी यवत पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास मौजे यवत येथील दोरगेवाडी परिसरातील शेतात घडली. याबाबत माधुरी विजय दिवेकर (वय ४७, रा. दोरगेवाडी, यवत) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादी यांच्या शेतात आरोपींच्या कुत्र्याने फुलांच्या झाडांचे नुकसान केल्याने त्यांनी संबंधितांना कुत्र्यावर नियंत्रण ठेवण्यास सांगितले. यावरून आरोपींनी फिर्यादी व त्यांचे पती विजय दिवेकर यांना बोलावून घेतले. सुरुवातीला नुकसानभरपाई देण्याची तयारी दर्शवली; मात्र त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली.भांडण सोडवण्यासाठी पुढे गेलेल्या फिर्यादींनाही ढकलून देण्यात आले. याचवेळी आरोपी शुभम ज्ञानेश्वर दिवेकर याने खिशातून लोखंडी चाकू काढून विजय दिवेकर यांच्यावर पोट व पाठीवर वार करत आज तुला मारून टाकतो अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या हल्ल्यात विजय दिवेकर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पुष्पा ज्ञानेश्वर दिवेकर व शुभम ज्ञानेश्वर दिवेकर (दोघे रा. दोरगेवाडी, यवत) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछ्ड) कलम १०९, ३५२, ३५१ (२)(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेची नोंद यवत पोलीस ठाण्यात रात्री ११.०५ वाजता करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक मारुती मेतलवाड यांनी गुन्हा दाखल केला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुवर्णा गोसावी पुढील तपास करत आहेत.

# धानोरा परिसरात २० हजार वर्षांपूर्वीचे जीवाश्म पाषाणयुगीन मानवाच्या वास्तव्याचे संकेत

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वर्ल्ड हेरिटेज डे च्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. चंद्रपूर तालुक्यातील धानोरा परिसरात वर्धा नदीकाठी सुमारे २० हजार वर्षांपूर्वीचे दुर्मिळ जीवाश्म, मानवी अवशेष आणि पाषाणयुगीन साधने सापडल्याचा दावा भूशास्त्र व पुरातत्त्व अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी केला आहे. धानोरा-भोयेगाव पुलाजवळ सुरू असलेल्या संशोधन मोहिमेत हा महत्त्वपूर्ण शोध लागल्याची माहिती त्यांनी दिली.

प्रा. चोपणे यांच्या माहितीनुसार, या ठिकाणी बायसन, हरीण, रानडुक्कर यांचे जीवाश्म मोठ्या प्रमाणात आढळले असून काही मानवी हाडांचे अंशही सापडले आहेत. हे जीवाश्म शेवटच्या हिमयुगाशी संबंधित प्लेइस्टोसिन युग मधील सुमारे २० हजार वर्षांपूर्वीचे असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.या शोधातील विशेष बाब म्हणजे येथे पाषाणयुगीन साधनेही सापडली आहेत. त्यामुळे त्या काळात प्राचीन मानव या परिसरात वास्तव्यास होता आणि वन्यप्राण्यांची शिकार करत होता, असे संकेत मिळतात. संशोधनात बायसनचे जीवाश्म सर्वाधिक प्रमाणात मिळाले असून, त्याशिवाय रानडुकराचे दात, हरिणाची हाडे तसेच इतर प्राण्यांचे अवशेषही आढळले आहेत.हे सर्व नमुने सुरक्षितरीत्या जतन करण्यात आले असून पुढील अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महाराष्ट्रात अशा स्वरूपाचा एकत्रित जीवाश्म व पाषाणयुगीन साधनांचा शोध दुर्मिळ मानला जात असून, या निष्कर्षामुळे संशोधकांचे लक्ष चंद्रपूरकडे वेधले गेले आहे.प्रा. चोपणे यांनी सांगितले की, सुमारे २० हजार वर्षांपूर्वी जगात हिमयुग अस्तित्वात होते. त्यानंतर तापमानवाढ होऊन हिमनद्या वितळल्या आणि मोठ्या प्रमाणात पूर आले. या पुरामुळे अनेक प्राणी नदीत वाहून गेले असावेत. कालांतराने गाळाखाली दडलेल्या या अवशेषांचे जीवाश्मात रूपांतर झाले. वर्धा नदीच्या वरोरा व चंद्रपूर तालुक्यातील काही भागात आजही गाळ, रेती व दगडांचे थर आढळतात.चंद्रपूर जिल्हा आधीपासूनच भूशास्त्रीय वारशासाठी महत्त्वाचा मानला जातो.

# जय परशुरामच्या घोषणाने केज शहर दणाणले;शोभा यात्रेत भगव्या शाली, टोप्या मुळे वातावरण भगवे मय

## भगवान परशुरामाच्या बाबतीत अनेक चुकीच्या गोष्टी पसरवल्या-ह.भ.प.लक्ष्मण महाराज इनामदार

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरामध्ये भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.जय परशुराम घोषणेने शहर दणाणले तसेच भगव्या शाली व टोप्या समाज बांधवांनी परिधान केल्याने भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.भव्य मिरवणूक मोटरसायकल रॅली व्याख्यान आरती प्रसाद व जय परशुरामच्या घोषणाने केज शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच यशस्वीविद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला व रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. शनिवार दि.१८ एप्रिल रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते अशा विविध उपक्रमाने भगवान परशुराम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. शोभायात्रेत सर्व महा पुरुषांच्या चौकांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.केज शहरात भगवान परशुराम जन्मोत्सव रविवार दिनांक १९ रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर साजरा करण्यात आला यावेळी वकीलवाडी हनुमान मंदिरापासून भगवान परशुरामाची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली यावेळी भगवान परशुराम यांच्या शोभायात्रे सोबतच मंत्रोच्चार करण्यात आले वकीलवाडी हनुमान मंदिर ते बालाजी मंदिर या पूर्ण वेळात शांतीपाठ तसेच वेदोक्त मंत्र चार श्री सूक्त आधीचे पाठ करण्यात आले तसेच भव्य मोटारसायकल रॅली भगवान परशुरामांच्या शोभा यात्रा प्रतिमेसह संपूर्ण शहरात साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत पुष्पहार अर्पण करण्यात आला तेथून पुढे संत भगवान बाबा चौकात संत भगवान बाबांचा जय घोष करत पुष्पहार अर्पण करण्यात आला.महात्मा ज्योतीबा फुले चौकात फुले यांना पुष्पहार अर्पण करून जयघोष करण्यात आला मंगळवार पेठ कॉर्नरला छत्रपती संभाजीमहाराज चौकाला पुष्पहार अर्पण करून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयघोष करण्यात आला.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष करत पुष्पहार अर्पण करण्यात आला. बालाजी मंदिरामध्ये रॅली पोहोचल्यानंतर ह.भ.प. लक्ष्मण महाराज इनामदार यांचे



व्याख्यान झाले या व्याख्यानात भगवान परशुराम यांच्या बद्दल अनेक मिथ्या माहिती पसरवण्यात आली असून भगवान परशुराम हे अन्यायाच्या विरोधात शस्त्र उचलणारे भगवान विष्णूचे सहाव्या अवतार होते तसेच साधू संतांचे रक्षण करणारे होते.ऋषीमुनींचा वारसा चालवणारी होते चारी वेदांचे ज्ञाता होते.भगवान परशुराम हे पिता आज्ञाधारक तसेच मातृभक्त होते त्यामुळे भगवान परशुराम हे शौर्य,धर्म,त्यागाचे प्रतीक होते तसेच भगवान परशुराम हे भगवान श्रीहरी विष्णूचा सहावा अवतार असल्याने व सप्तचिरंजीवांपैकी एक असल्याने आजही आदर्श चरित्र आहेत असे ह.भ.प.लक्ष्मण महाराज इनामदार यांनी सांगितले

यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यामध्ये आंबेजोगाई नगर परिषदेची उप मुख्याधिकारी पदाची सूत्र असणारे श्री. सचिनजी देशपांडे, महाराष्ट्र शासनाचे अधिस्वीकृती समितीचे सदस्य अनिलजी महाजन,वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रवीण देशपांडे निवृत्त नायब तहसीलदार सुनील देशपांडे,दोन मुले एमबीबीएस ला लागणारे बाळासाहेब शेटे,अटल बिहारी वाजपेयी आयुर्वेदिक महा विद्यालयात लागलेली मृण्मयी प्रवीण देशपांडे यांच्यासह मान्यवरांचा तसेच विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच रांगोळी स्पर्धेत बक्षीस मिळवणाऱ्या चा प्रशस्तीपत्र व रोख रकमे सह सत्कार करण्यात आला.त्यानंतर भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती करून महाप्रसाद वाटप करण्यात आला.हा जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्या साठी जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष व्यंकटेश महाजन, धनंजय कुलकर्णी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीनिवास केजकर, सचिव श्रीधर खोत, उपाध्यक्ष श्रीराम शेटे, कोषाध्यक्ष शिवराज मुथळे,प्रसिद्धीप्रमुख चंद्रकांत पाटील यांच्या सह समाज बांधवांनी प्रयत्न केले.आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.

# केज येथे चाईल्ड प्रायमरी स्कूलचा स्वराज्य बाल महोत्सव उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या वतीने स्वराज्य बाल महोत्सव वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार रोजी उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रप्रमुख संजय चौरे,कार्यक्रमाचे उद्घाटक गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे,विशेष उपस्थिती अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर, प्रमुखअतिथी भाई मोहन गुंड,डॉ.हनुमंत सौदागर, हनुमंत भोसले,डॉ.नागेश कराळे,अड.अविनाश धायगुडे,शिवाजी ठोंबरे, कृष्णाजी थोरात,गोविंद ससाणे,उपेंद्र शिंदे, ज्ञानेश्वर बिराजदार,एच. पी.देशमुख,शरीफजी सय्यद,चंद्रकांतजी पाटील,दत्ता मुजमुले, अनिल गलांडे,विष्णु आबा तपसे,अजय चाटे, साईनाथ गावडे,अलीम सय्यद,अक्षय येवले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्नेहसंमेलनात मराठी, हिंदी लोकगीत,भावगीत धमाल कॉमेडी,पर्यावरण शिक्षण,अंधश्रद्धानिर्मूलन अशा विविध विषयावर नृत्य,गीत,नाटिका, शेतकरी गीत तसेच




देशभक्तीपर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.लहानग्या विद्यार्थ्यांच्या आकर्षक व रंगतदार सादरीकरणा मुळे प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.यावेळी बोलताना रमेशराव आडसकर म्हणाले की,सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे उद्घाटक गट शिक्षणाधिकारी सुनील केंद्रे म्हणाले की,केज तालुक्यातील उपक्रम शील शाळा म्हणून या शाळेकडे पाहिले जाते व ही गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी शाळा आहे. इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते,असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे संचालक श्री. शरद गिराम यांनी केले. यावेळी त्यांनी, आम्ही विद्यार्थ्यांना कृतीप्रधान शिक्षण देतो असा शाळेचा प्रगत अहवाल वाचन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, श्रीमती शिंदे , श्रीमती साखरे , श्रीमती तपसे , श्रीमती राऊत , श्रीमती पुरी , भाऊसाहेब शिंदे, हर्षद गिराम, सचिन गिराम,प्रकाश काळे ,अनिल चटप, बिरूदेव भंडारे, गोरख चाळक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापनाबद्दल उपस्थितांनी शाळेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमास विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोणगांव बु येथे अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य परायण सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बिलोली तालुका व परिसरात सुप्रसिद्ध असलेल्या डोणगांव बु. येथील अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य परायण सोहळ्याचे आयोजन दिनांक १८ एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान पार पाडणार आहे यांत दैनंदिन शिवपाठ रुद्राभिषेक परमहस्य पारायण गाथा भजन प्रवचन शिवपाठ शिवकिर्तन व रात्री शिवजागर आदी कार्यक्रम पंचक्रोशीतील जागृत

ग्रामदैवत शंभू महादेवाच्या प्रांगणात पार पडणाऱ्या या शिवनाम सप्ताह चे यंदा १३ वे वर्ष आहे.

या सप्ताहाचे विशेष आकर्षण भव्य दिव्य हजारोच्या संख्येने आबालवृद्ध शिवपाठ व पाऊले खेळणे, फुगड्या दररोज पंगत महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन

समस्त गावकरी मंडळी डोणगांव बु. ता. बिलोली जि नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# केज येथे विजय स्पोर्ट्स क्रीडा अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहर व तालुक्यातील नवोदित खेळाडूंसाठी विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीचे संचालक विनोद गुंड यांनी दिली आहे.

विजय स्पोर्ट्स अकॅडमी च्या वतीने १ मे २०२६ ते १ जून २०२६ या कालावधी दरम्यान एक महिन्याचे फुटबॉल, व्हॉलीबॉल,क्रिकेट,योगा, बुद्धीबळ आदी खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आयोजन केले आहे.या शिबिरामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने क्रीडा प्रशिक्षण दिले जाणार असून या शिबिरात १४ वर्षा खालील मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर स्वामी विवेकानंद



इंग्लिश स्कूल च्या मैदानावर सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे.या शिबिरात केज तालुक्यातील खेळाडूनी सहभागी व्हावे असे आवाहन विजय स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने क्रीडा संघटक विनोद गुंड यांनी केले आहे.

# परळीत श्री.भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त शानदार शोभायात्रा; आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाला शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त परळी शहरात शानदार शोभायात्रा काढण्यात आली. आ. धनंजय मुंडे व नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शोभा यात्रेचा शुभारंभ झाला. शांतता व शिस्तीच्या आदर्शाने शोभायात्रा लक्षवेधी ठरली. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मप्रेमी सहभागी झाले होते. सकल ब्राह्मण समाज यांच्या वतीने या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

संत जगमित्रनागा मंदिर येथुन शोभायात्रेला प्रारंभ झाला. प्रारंभी आ. धनंजय मुंडे ,नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, आदी मान्यवरांच्या हस्ते भगवान परशुराम प्रतिमेचे पूजन करून व माल्यार्पण करून शोभायात्रेस सुरूवात झाली. नेहरू चौक - राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक- गणेशपार -नांदूरवेस - सरकारवाडा -अंबेवेस- काळाराम मंदिर पर्यंत नगरप्रदक्षिणा करण्यात आली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी व उपस्थित सर्व महिलांच्या शुभहस्ते भगवान परशुरामांची आरती करून जन्मोत्सव सोहळ्याचा समरोप झाला. या दिव्य सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. ब्राह्मण समाज बांधव सहकुटुंब या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्यात महिलांचा लक्षणिय सहभाग होता.

सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. परळी शहरातून मुख्य मार्गावर शांतता व शिस्तीच्या आदर्शाने निघालेली शोभायात्रा लक्षवेधी ठरली. 'भारत माता की जय','वंदे मातरम्','जय श्रीराम -जय परशुराम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत करून नागरीकांनी भगवान परशुरामाचे दर्शन घेतले. जुन्या गावभागात जागोजागी रांगोळी व महिलांनी भगवान परशुरामांचे औक्षण करून दर्शन घेतले.

# बुद्धंम शरणम् गच्छामि संगीतमय महानाट्याने केजकरांना जिंकले,केज शहरात प्रथमच नाटकाचा आनंद सर्व जाती-धर्माच्या नागरीकांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त केज येथे बुद्धंम शरणम् गच्छामि या संगीतमय महानाट्याचे आयोजन भारतीय शेतकरी कामगार पक्ष, क्रांतीसिंह नाना पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने भाई मोहन गुंड यांनी केले होते.संगीतमय महानाट्य रविवार,दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६-३० वाजता जयभवानी चौक येथील मुक्ताई फंक्शन हॉलमध्ये हा कार्यक्रम सायंकाळी ७-०० वाजता महानाट्य सुरू झाला,हैद्राबाद येथील अभ्युदय आर्ट्स अकादमीचे २२ नाट्य कलावंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्ष गाथा हिंदी भाषेतून प्रभावीपणे सादर केले.कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते रणजितसिंह पाटील, माजी पंचायत समिती सभापती राजेसाहेब पापा देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती माजी आमदार संगीता ठोंबरे,शेकापचे कार्यालयीन सहचिटणीस डॉ.उमाकांत राठोड, चिटणीस मंडळ सदस्य भाई दिगंबर कांबळे, शिक्षक आघाडीचे नेते भाई चंद्रकांत चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाचे पूर्व जिल्हा चिटणीस ड.नारायण गोले पाटील,शेकापचे पश्चिम जिल्हा चिटणीस बापूसाहेब सोळंके, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे,छावाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे,माजी उपनगराध्यक्ष इनामदार माजी नगराध्यक्ष कबीरोदिन इनामदार आरपीआय चे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,नगरसेवक सोमनाथ गुंड, समाजवादीच्या नेत्या सालेहा शेख पठाण, माजी नगरसेवक कपिल



मस्के,सामाजिककार्यकर्तेअशोक गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड, समता सैनिक डॉ. प्रभाकर ठोके,भारतीय बुद्ध महासंघ जयपाल मस्के,आरपीआयचे ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे, सुशील तात्या टोपे , प्रियंका लांडगे,गौतम बचुटे,शरद थोरात,रोहित कसबे,पत्रकार संतोष गालफाडे,पत्रकार महादेव गायकवाड यांची उपस्थिती होती. या संगीतमय महानाट्या साठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला होता तसेच महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था करण्यात आली होती.या कार्यक्रमाला महिलांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**केज शहरात प्रथमच भव्य संगीत महानाट्याचा प्रयोग** -केज शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांवर सादर करण्यात आलेले संगीतमय महानाट्य केज करांना पाहण्याची संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल आयोजक शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांचे सर्वत्र सर्वच समाज बांधवा कडून कौतुक होत आहे.कलाकार एवढे हुबेहुब पात्र सादर करत होते की प्रेक्षक भावुक झाले.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील बैलगाडीतून खाली उतरणे,शाळेत वेगळे बसायला लागणे,औषधा विना मुलांचा आणि रमाईचा मृत्यू याने महिला प्रेषकांच्या डोळ्यात पाणी तरळले तर चवदार तळ्याचा संघर्ष,पुणे करार, काळाराम मंदिर सत्याग्रह,डॉ.बाबासाहेब आंबेडकर विलायतेहून आल्या नंतर शाहू महाराजांनी केलेला त्यांचा सत्कार आणि राज्यघटना देशाला अर्पण करण्याच्या हुबेहूब कलाकारांनी सादर केलेला प्रसंग पाहून प्रेक्षकांनी जोरदार घोषणांनी हॉल दणाणून सोडला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भाई अशोक रोडे,ड.निखील बचुटे,निखिल समुद्रे,प्रदीप गायकवाड,शेख रज्जाक, अक्षय हजारे,गुड्डू खतीब, मंगेश देशमुख,राजेभाऊ गुंड,अजिंक्य माने,नावेद मुलानी,दत्ता वाघमारे, रामलिंग पाटील यांनी परिश्रम घेतले.या महानाट्याची चर्चा पूर्ण तालुक्यामध्ये होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077